पुढारी MY कोल्हापूर गुरुवार, १० ऑक्टोबर २०२४

# विवेकानंद महाविद्यालयात वन्यजीव सप्ताहास प्रारंभ

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आणि विज्ञान विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. ए. एस. कुंभार यांच्या हस्ते झाले. उपक्रमांतर्गत रांगोळी, भाषण, निबंध, पोस्टर, वन्यजीव फोटो स्पर्धा, हस्तकला प्रतिकृती, लघुपट, हाताने रंगविण्याच्या स्पर्धा तसेच प्रश्नमंजूषा स्पर्धा झाल्या. यात १३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धा परीक्षक म्हणून प्रा. वृषाली मिसाळ , डॉ. कोमल भिसे, डॉ. ई. बी. आळवेकर, एस. जी. कुलकर्णी, ऋषीकेश गोनी सतीश उपळावीकर, डॉ. आर. वाय. पाटील यांनी काम पाहिले.

# तरुण भारत

कोल्हापूर

www.tarunbharat.com

गुरुवार दि. १० ऑक्टोबर २०२४


## विद्यापीठ युवा महोत्सवात सलग १६ वर्षे विवेकानंद अव्वल


प्रतिनिधी

कोल्हापूर


आजरा महाविद्यालय, आजरा येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ४४ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजने विविध १६ कला प्रकारात पुरस्कार प्राप्त करुन विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान पटकावला. यामध्ये अभिजीत कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशीप फिरता चषक, सरदार बाबासाहेब माने फिरता चषक, वैयक्तिक फिरता गौरव चषक, नृत्य विभाग फिरता गौरव चषक, संगीत विभाग फिरता गौरव चषक मिळविण्याचा बहुमानही पटकावला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मध्यवर्ती युवा महोत्सवात प्रथम क्रमांक पटकावलेल्या विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसोबत संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सर्व प्राध्यापक.

मध्यवर्ती युवा महोत्सवात प्रश्नमंजुषा प्रथम, भारतीय समुहगीत प्रथम, पाश्चिमात्य समुहगीत प्रथम, लोकनृत्य प्रथम, शास्त्रीय नृत्य प्रथम, नकला प्रथम, व्यंगचित्र प्रथम, पाश्चिमात्य एकल वादन व्दितीय, हिंदी वक्तृत्व – व्दितीय, स्थळ चित्रण व्दितीय, सांघिक रचनाकृती व्दितीय, लोकसंगीत वाद्यवृंद तृतीय, लोकवाद्य एकल वादन उत्तेजनार्थ, पाश्चिमात्य एकल गायन उत्तेजनार्थ या कलाप्रकारात पारितोषिके प्राप्त केली. या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते सांस्कृतिक विभागातील या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

साळुंखे म्हणाले, गेली सोळा वर्षे विवेकानंद महाविद्यालय शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये जनरल चॅम्पियनशीप पटकावत आहे. ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांचे कष्ट, तयारी, शिक्षकांचे उत्कृष्ठ मार्गदर्शन यामुळेच हे यश मिळाले आहे.

या यशाबद्दल सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आरिफ महात, सदस्य डॉ. राजश्री पाटील, प्रा. एस. एस. कदम, प्रा. एच. व्ही. चामे, प्रा. संदीप पाटील, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. संपदा टिपकुर्ले, प्रा. सतीश उपळावीकर, संगीत शिक्षक महेश हिरेमठ व प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन केले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी कौतुक केले.